नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


# प्रेस नोट

दिनांक 27/03/2021 (शनिवार)
(सायंकाळ)

---

## अपघातात मृत्यु

पो.स्टे. मौदा :– अंतर्गत मोठया पुलावर मौदा येथे दिनांक 13/03/2021 चे 10:30 वा. दरम्यान विलास सुखदेव उसरे(मृतक), वय 26 वर्ष रा. भामेवाडा ता. कामठी जि. नागपुर हा भामेवाडा या गावाला एकटा पायदळ जात होता. त्यादरम्यान एमएच– 36/एफ– 1565 क्रमांकाच्या टाटा 407 गाडीचा चालक आरोपीने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन विलास उसरे यास धडक दिली. या अपघातात तो गंभीर जखमी होवुन त्याच्या डोक्याला, पोटावर मार लागला. त्यास उपचारकामी मेडीकल कॉलेज नागपुर येथे दि. 14/03/21 चे 05.30 वा. भरती केले असता उपचार दरम्यान दि. 16/03/21 रोजी 07.00 वा. मरण पावला. मेडीकल कॉलेज नागपुर येथुन प्राप्त कागदपत्रावरून सदर गुन्हा नोंद.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– कैलास सुखदेव उसरे, वय 26 वर्ष, रा. भामेवाडा ता. कामठी जि. नागपुर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोहवा कुथे मो.नं. 9764007720 हे करीत आहे.

## गळफास लावून मृत्यू

1) पो.स्टे. भिवापुर :– अंतर्गत 01 कि. मी. अंतरावर वार्ड क्र. 5 भिवापुर येथे दिनांक 26/03/2021 चे 04.30 वा. दरम्यान रमेश श्रीरामे टेंभुर्णे (मृतक), वय 46 वर्ष, रा. वार्ड 5 भिवापुर याने अज्ञात कारणाने त्याचे राहते घरी लाकडी फाटयाला नायलॉन दोरीने गळफास घेतल्यानंतर तो मृत अवस्थेत आढळुन आला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– चंद्रशेखर श्रीरामे टेंभुर्णे वय 53 वर्ष रा. वार्ड 5 भिवापुर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. भिवापुर येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोहवा रेवतकर 8888102302 हे करीत आहे.

2) पो.स्टे. वेलतुर :– दिनांक 26/03/2021 चे 07.00 वा. दरम्यान शेषराव आखाडु मेश्राम(मृतक), वय 51 वर्ष, रा. हरदोली नाईक ता. कुही जि. नागपूर यांनी अज्ञात कारणातुन मौजा हरदोली नाईक डोगाघाट येथे कडुलिंबाच्या झाडाला नायलॉन दोरीने गळफास घेत्यानंतर ते मृत अवस्थेत आढळुन आले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– सौ. निता शेषराव मेश्राम(मृतक), वय 45 वर्ष, रा. हरदोली नाईक ता. कुही जि. नागपूर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. वेलतुर येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोहवा मधुकर सुरपाम हे करीत आहे.

# अकस्मात मृत्यू

पो.स्टे. मौदा :– अंतर्गत मौजा चिरवा येथे दिनांक 21/03/2021 चे 06.00 वा. दरम्यान दामिनी योगराज तिजारे, वय 23 वर्ष, रा. चिरवा ता. मौदा जि. नागपूर हिने अज्ञात कारणातुन विषारी औषध प्राशन केले. तिची प्रकृती खराब झाल्याने तिला उपचाराकरीता जिल्हा सामान्य रूग्णालय भंडारा येथे नेले असता वैदयकिय अधिकारी यांनी तपासुन मृत घोषीत केले. पोस्टे भंडारा येथुन प्राप्त कागदपत्रावरून सदर मर्ग नोंद.

सदर प्रकरणी सर तर्फे पोलिस हवालदार डाकराम एन. नंदेश्वर पो.स्टे. भंडारा यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. मौदा येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सफौ ठाकुर हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर